Email:- dailydivyawarta@Gmail.com

Email:-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. २८ सप्टैंबर २०२५ पाने ४ किंमत ३

### मशिदीतून चिरकण्याचा आवाज,अपंग सिकंदरच्या गळ्यापर्यंत पाणी
## सुरेशनं जीवाची बाजी लावत वाचवला प्राण



माढा, (वृत्तसेवा):- नैसर्गिक आपत्तीमध्ये मनुष्य हा जाती-धर्माच्या पलीकडे जाऊन एकमेकांना मदत करतो, हे आपण अनेक प्रसंगात अनुभवलं आहे. असाच प्रसंग सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्याच्या सीना नदीकाठच्या ▶▶ पान २ वर

# बीडकरांनो ज्यांच्या हाती बीडची सत्ता होती त्यांच्याच आशिर्वादामुळे आज तुमचीही अवस्था

# पुन्हा ते आज तुमच्या भेटीला येवून सांत्वन करतात

**तुम्ही त्यांना का विचारत नाही? तुम्ही बीड शहराचे हे हाल का केले?;सत्तेच्या मस्तीत राहून बेभाम आलेला विकास निधी लुटून खाल्ला आणि पुन्हा येणारा निधी लुटून खाण्यासाठी तयार होत आहात का?**




### त्या काळातील सत्ताधाऱ्यांसह ठेकेदार, मुख्याधिकारी, इंजिनिअर यांना तर खरेच जेलमध्येच टाकणे योग्य

## पावसामुळे बीडमध्ये नुकसानीचे तांडव, हेच का तुमचा बोगसगिरीचा विकासपर्व भूषण

बीड,(दिव्य न्युज):- मागील ८ दिवसांपासून बीड शहरामध्ये अनेक भागात पावसाचे पाणी शिरले. दुकानात, घरामध्ये, पार्किंगमध्ये तर पाणी शिरलेच परंतु अनेक ठिकाणी रस्त्याला नदीचे स्वरूप आले. बीड शहरातील धांडे नगरमध्ये तर कमरे इतके पाणी रस्त्यावर होते. आजुबाजुच्या घरातील लोकांचे मोठे नुकसान झाले. दळणवळण ठप्प झाले. आज लोक ओरडू लागले आहेत, परंतु या सर्व परिस्थितीला ज्यांनी ज्यांनी अतिक्रमणे केले ते नागरीक नाल्या, रस्त्याचे योग्य नियोजन न करणारे गुत्तेदार या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवणारे नगर पालिकेचे सीओ हेच जबाबदार आहेत. तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या काळात सर्वाधिक बेकायदेशीर बांधकामे झालेली आहेत. पुन्हा अशी परिस्थिती टाळायची असेल तर नगर पालिकेने पोलीस बंदोबस्तात एकाच वेळी २० जेसीबी लावून नाल्या, नाल्यांवर टाकलेले स्लॅब, बंद केलेल्या नाल्या, वळविलेल्या नाल्या, अडवाअडवी हे सर्व तोडून पाण्याला वाट काढून दिली पाहिजे, नसता यापेक्षा आणखी गंभीर परिस्थिती निर्माण होईल.मागील ८ दिवसांपासून बीडमध्ये नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे. बीड शहरातील

### धांडे नगरचे हाल केवळ तत्कालीन सीओ अंधारेंमुळेच

बीड शहरातील बाशी रोडवरीलधांडे नगरमध्ये शनिवारी नागरिकांचे प्रचंड हाल झाले. अनेक दुकाने, हॉस्पिटास, हॉटेल्स आणि घरांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी शिरल्याने नुकसान झाले. गेल्या ८ दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे धांडेनगरवासीय प्रचंद यातना सहन करत आहेत. याला जबाबदार बीड नगर पालिकेच्या तत्कालीन सीओ नीता अंधारे याच असल्याचा आरोप

### कलेक्टर साहेब, पोलीस सोबत घेऊन अतिक्रमण काढायला लावा

बीड शहरात मुसळधार पावसाने पाणीच पाणी झाले आहे. जागोजाग झालेल्या अतिक्रमणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. याला आताच रोखले नाही तर यापुढे वाच्याही पेक्षा भयानक परिस्थिती निर्माण होऊ शकते. शनिवारच्या पावसामध्ये अनेक ठिकाणी पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले. अतिक्रमणधारकांवर कसलाच वयक राहिलेला नाही. कोणी विचारणारं नाही म्हणून वाटेल तसं पोलीसच्या गाड्या सोबत घेऊन उभे राहून अतिक्रमण काढायला लावावे.

### वरद डेव्हलपर्सने नाल्याची वाट लावून टाकली

पीड शहरातील काकू-नाना हॉस्पिटलच्या पाठिमागून जाणारा नाला बंद करण त्याला दुसरीकडून वाट काढून दिली आहे. नात्याचा नैसर्गिक पलो रोखल्यामुळे या ठिकाणी पाणी जाजुयाजूला पुसत आहे. नगर पालिकेच्या टिमने शनिवारी त्या ठिकाणी जाऊन पाहणी करन अहवाल तयार केलेला नाहे. शहरातील जुने मोठमोठे नाले बंद करून हे वांधकाम व्यावसायीक आपल्या फायद्यासाठी काहीही करत आहेत. याप्रकरणात प्रशासनाने तथ घालून कारवाई करण्याची गरज आहे.

### जालना रोडवर रिलायन्स मॉल, इंजि. चाटेने नाल्यावर टाकलेले स्लॅब तोडा

बीडमधील जालना रोडच्या कामासाठी कोट्यावधी रुपये खर्च करण्यात आले, मात्र शनिवारच्या पावसात हा रोड पूर्णपणे पाण्यात गेला होता. जालना रोडला एकाच बाजुने मोठा नाला आहे. तेच पाणी रोडवर येऊन वाहतुकीला, रहदारीला अडथळा ठरत आहे. याच नाल्यावर रिलायन्स मॉलच्या जागा मालकाने लांबच्या

### तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी फिरुन केली पाहणी

बीड शहरातील बिंदुसरा नदीला पूर आल्याने नदी काठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. बिंदुसरा नदी दुथडी भरून वाहत असल्याने काही ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरु लागले आहे. शनिवारी दुपारी पोलीस अधीक्षक नवनीत कवित यांनी जुना बाजार भागात ठिकठिकाणी भेटी देऊन पाहणी केली. दगडी पुलावरुन पाणी जात असल्याची पाहणी करून तिथे असलेल्या उघड्या डीपी संदर्भात त्यांनी संबंधीत यंत्रणेला सूचना दिल्या. अबीडचे तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी देखील शहरात ठिकठिकाणी पायी फिरुन अतिवृष्टीने बाधित ठिकाणांची पाहणी केली.

## बीड शहरातील धांडे नगर भागात डॉ.योगेश क्षीरसागरांची जिल्हाधिकाऱ्यांसोबत पाहणी


**विविध भागात नगरपरिषदेची यंत्रणा लावली कामाला**

बीड, (दिव्य न्युज):- शहरातील धांडे नगर भाग संपूर्णतः जलमय झाला असून तेथील पाणी निचऱ्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली होती. या मागणीवर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्याधिकारी शैलेश फडसे, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्यासह नगरपरिषद प्रशासनाने रविवारी (दि.२८) धांडे नगर परिसराची पाहणी केली.स्थानिक नागरिकांशी संवाद साधून नाल्या तातडीने स्वच्छ करून पाणी निचऱ्यासाठी उपाययोजना करण्याच्या



## दौलावडगाव व केळ परिसरातील तलाव फुटण्याचा धोका

दौलावडगाव, (दिव्य न्युज):-आष्टी तालुक्यातील मौजे दौलावडगाव गावातील तलाव क्रमांक ३ (केळ व दौलावडगाव शिवारातील पाझर तलाव) या तलावाला सांडच (सांडवे) नसल्यामुळे नागरिक आणि शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या तलावाची रचना करताना मूलभूत तांत्रिक बाबींकडे दुर्लक्ष करण्यात आले असून, सांडवे न ठेवता तयार केलेल्या या तलावासाठी जबाबदार असणाऱ्या पाटबंधारे विभागातील अभियंत्यांचा विशेष सन्मान करावा, अशी उपरोधिक



## अहमदनगरच्या आरटीओ गीता शेजवळ ३ हजाराची लाच घेतांना जाळ्यात



अहमदनगर , (दिव्य न्युज):- ऐन नवरात्री उत्सवाच्या तिसऱ्याच दिवशी संपूर्ण पूर्वीच्या अहमदनगर व आताच्या अहिल्यानगर जिल्ह्यात क्लास वनच्या पोस्टवर असलेल्या महिला आरटीओ अधिकाऱ्याला केवळ ३००० रुपयांच्या लाचखोरीच्या प्रकरणांत पकडण्यात आल्याने राज्यात एकच खळबळ उडाली आहे.

गीता भास्कर शेजवळ,वय ४४ वर्ष ,पद मोटार वाहन निरीक्षक (वर्ग १ ) नेमणूक, प्रादेशिक परिवहन कार्यालय अहिल्यानगर, ता. जि. अहिल्यानगर, रा. केडगाव, ता. जि, अहिल्यानगर.व इस्माईल पठाण, वय ४३ वर्ष,खाजगी इसम, रा. श्रीरामपूर नेवासा रोड, अशोक पेट्रोल पंप समोर ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर असे पकडण्यात आलेल्या लाचखोरांच्या नावे आहेत.अहिल्यानगर एसीबीच्या कार्यालयात प्रत्यक्ष येऊन तक्रारदाराने लेखी तक्रार दिली की, त्यांना मौजे पाटस येथून श्री सिमेंट कंपनी ते अहिल्यानगर येथे ओव्हरलोड सिमेंटची गाडी चालवू देण्यासाठी तक्रारदार यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालय अहिल्यानगर येथे दि.२२/९/२०२५ रोजी समक्ष येऊन भेट घेतली असता,सदर ठिकाणी मोटर वाहन निरीक्षक,अहिल्यानगर

## टीईटीमुळे शिक्षक दडपणात

मुंबई , (दिव्य न्युज):- पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले. त्यामुळे हजारो शिक्षक दडपणाखाली आले. शासनाने यातून मार्ग काढावे, अशी मागणी होत आहे.

नुकतेच सर्वोच्च न्यायालयाने शिक्षणाचा अधिकार २००९ कायदा (आरटीई) संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय दिला. शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी सहा ते १४ वयोगटातील मुलांना गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शिक्षकांची पात्रता




बीड : बीडच्या पोलीस सेवेत असलेले विक्की सुरवसे यांचा आज वाढदिवसानिमित्त कश्मकश, दिव्य वार्ता कार्यालयात त्यांना पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा देतांना दिव्य वार्ताचे कार्यकारी संपादक काशेफ चाऊस सह सागर बहिर, विनोद कुटे, पाळवदे आदी.

## पीआय बल्लाळ यांनी टपरीवाल्यांना बोलावून दिल्या सूचना

**फुलचंद पान विकल्यास तुमची खैर नाही, गुटखा विकू नका, टवाळखोरांना थारा देवू नका**

बीड (दिव्य न्युज) - गुन्हेगारी रोखण्यासाठी आणि टवाळखोरांना लगाम लावण्याच्या अनुषंगाने शहर ठाण्याचे पो.नि.शितलकुमार बल्लाळ यांनी आज सकाळी शहरातील सर्व टपरी चालकांना बोलावून घेत त्यांना सक्त सुचना दिल्या आहेत. काही टपरीवाले नशेच्या पदार्थाचा वापर करून फुलचंद पानाची विक्री करत आहेत. सदरील प्रकार गंभीर असून यापुढे कोणी फुलचंद पान विकल्यास त्यांची खैर नाही. गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ विकू नका, टवाळखोरांना आपल्या टपऱ्याजवळ थारा देऊ नका अशी तंबीही पो.नि.बल्लाळ यांनी बीड शहरातील सर्व टपरीचालकांना दिली आहे. नागरीकांनीही एखादा टपरीवाला नशायुक्त फुलचंद पान विकत असल्याचे दिसुन आल्यास त्याची माहिती



# जमीन खरेदी-विक्रीचा नियम बदलला!

## आता मोजणीशिवाय नोंदणी नाही; राज्य सरकारचा मोठा निर्णय

मुंबई , (दिव्य न्युज):- राज्यातील जमीन खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी आणि भविष्यातील वाद टाळण्यासाठी राज्य सरकारने एक मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यापुढे महाराष्ट्रात कोणत्याही जमिनीची खरेदी-विक्री करण्यापूर्वी त्या जमिनीची अधिकृत मोजणी करणे अनिवार्य असणार आहे. मोजणी केल्याशिवाय जमिनीची दस्त नोंदणी किंवा रजिस्ट्री केली जाणार नाही. राज्याचे महसूल मंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी नुकतीच ही घोषणा केली आहे.

आंध्र प्रदेश आणि कर्नाटक राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रातही हा नवीन नियम लागू करण्यात येणार आहे. या नियमानुसार, जेव्हा कोणी जमीन विकत घेईल किंवा विकेल, तेव्हा त्या व्यवहाराची नोंदणी करण्यापूर्वी भूमी अभिलेख कार्यालयाकडून किंवा शासनमान्य खाजगी संस्थेकडून त्या जमिनीची रीतसर मोजणी करून घ्यावी लागेल. या मोजणीचा अहवाल दस्त नोंदणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक असेल. हा अहवाल सादर केल्यानंतरच संबंधित जमिनीची नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली जाईल.

आतापर्यंत राज्यात जमिनीची दस्त नोंदणी करण्यासाठी मोजणीची अट नव्हती. नागरिक थेट उपनिबंधक कार्यालयात जाऊन खरेदी-विक्रीचे व्यवहार नोंदवत होते. मात्र, यामुळे अनेक समस्या निर्माण होत होत्या. विशेषतः जमिनीच्या हद्दीवरून खरेदीदार आणि विक्रेते किंवा शेजारी यांच्यात मोठे वाद निर्माण होत होते. अनेक प्रकरणे न्यायालयात जात होती, ज्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसा अनावश्यकपणे खर्च होत होता. या सर्व बाबींना आळा घालण्यासाठी आणि जमीन व्यवहारांमध्ये अचूकता व पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

यापुढे जमिनीच्या मालकी हक्काचे हस्तांतरण तीन टप्प्यांत पूर्ण होईल: पहिला टप्पा (जमीन मोजणी): खरेदी-विक्री व्यवहारापूर्वी जमिनीची अधिकृत मोजणी करणे. दुसरा टप्पा (दस्त नोंदणी): मोजणीचा अहवाल जोडून उपनिबंधक कार्यालयात दस्त नोंदणी करणे. तिसरा टप्पा (फेरफार): दस्त नोंदणी झाल्यानंतर जमिनीचा फेरफार घेतला जाईल आणि मालकी हक्क बदलेल.

खाजगी भूकरमापकांची घेतली जाणार मदत

राज्यात जमीन मोजणीच्या कामाचा व्याप मोठा आहे. भूमी अभिलेख कार्यालयावर कामाचा अतिरिक्त ताण येऊ नये, यासाठी शासनाने एक महत्त्वाचा उपाय योजला आहे. जमाबंदी आयुक्त कार्यालयाच्या अखत्यारीत सुमारे १० ते १५ परवानाधारक खाजगी संस्थांच्या भूकरमापकांची मदत घेतली जाणार आहे. नागरिक या खाजगी संस्थांकडूनही आपल्या जमिनीची मोजणी करून घेऊ शकतील आणि त्यांचा अहवाल नोंदणीसाठी ग्राह्य धरला जाईल.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने आरिफ पठाण सन्मानित



शिर्डी , (दिव्य न्युज):- येथे बि द चेंज फाऊंडेशन तर्फे आयोजित भव्य सोहळ्यात, सन्माननीय खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यात क्रांतिकारी शिक्षक संघटना, नागपूर चे अध्यक्ष आरिफ हबीबखान पठाण यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी गौरविण्यात आले.पुरस्कार स्वीकारताना त्यांनी हा सन्मान आपल्या दिवंगत वडील हबीबखान पठाण तसेच डॉ. अक्रम पठाण यांना समर्पित केला. तसेच या यशाचे संपूर्ण श्रेय क्रांतिकारी शिक्षक संघटनेचे संस्थापक श्री. शाहेद कादरी यांना देऊन त्यांनी आपली कृतज्ञता व्यक्त केली.शिक्षणातून समाज परिवर्तन घडविण्याचा ध्यास घेतलेले आरिफ पठाण हे आजच्या शिक्षकांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व ठरत आहेत.

## जग हादरलं! इस्त्रायलचा गाझावर सर्वात मोठा हवाई हल्ला



दिल्ली, (वृत्तसेवा):- सध्या इस्त्रायल आणि हमास यांच्यात घणघोर युद्ध चालू आहे. इस्त्रायली लष्करकडून गाझावर मोठ्या प्रमाणात हल्ला केला जात आहे. फ्रान्स, ऑस्ट्रेलियासह इतरही काही देशांनी पॅलेस्टाईनला राष्ट्र म्हणून मान्यता दिली आहे. यामुळेदेखील इस्त्रायलने आक्रमक पवित्रा धारण केला आहे. काहीही झालं नाही तरी आम्ही माघार घेणार नाही, असं इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामीन नेतान्याहू यांनी जाहीर केलेले आहे. असे असतानाच आता पुन्हा एकदा इस्त्रायलने गाझा शहरावर मोठा हल्ला केला आहे. या हल्ल्यात तब्बल ३२ लोकांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे आता इस्त्रायल-हमास यांच्यातील युद्ध कुठपर्यंत चिघळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार इस्त्रायलने गाझावर पुन्हा एकदा मोठा हवाई हल्ला केला आहे. या हल्ल्याबाबत गाझाच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी सविस्त माहिती दिली आहे. २६ सप्टेंबरच्या रात्री इस्त्रायलने रात्रभर गाझावर हवाई हल्ले केले. यात ३२ लोकांचा मृत्यू झाला आहे, असे या अधिकाऱ्याने सांगितले आहे. तसेच मध्य आणि उत्तर गाझामध्ये हे हल्ले झाले आहेत. या भागातील एका शरणार्थी शिबिरात एकाच कुटुंबातील नऊ जाणांचा मृत्यू झाला आहे. अल अवादा रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी दिली आहे.

संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण सभेत नेतान्याहू यांनी भाषण केले. या भाषणातदेखील त्यांनी पॅलेस्टाईनला राष्ट्र म्हणून दर्जा देण्याला विरोध केला. तसेच गाझाविरोधातील युद्ध आम्ही चालूच ठेवणार आहोत, असे संकेत त्यांनी आपल्या या भाषणात दिले आहे. मात्र नेतान्याहू यांनी आपले भाषण चालू करण्याआधीच त्यांच्या भूमिकेचा निषेध म्हणून काही राष्ट्रांनी सभात्याग केला होता. या भाषणांतर आता इस्त्रायलने हे हल्ले केले आहेत.इस्त्रायल आणि हमास यांच्यातील युद्ध संपावे यासाठी अनेक देशांनी पॅलेस्टाईनला राष्ट्र म्हणून मान्यता दिल आहे. यामुळे इस्त्रायलवर एका प्रकारे दबाव वाढलेला आहे. इस्त्रायलचा मात्र पॅलेस्टाईनला राष्ट्र संबोधन्यास विरोध आहे. पॅलेस्टाईनला मान्यता म्हणजे हमासला एका प्रकारे पुरस्कार दिल्यासारखेच आहे, असे इस्त्रायलचे मत आहे. इस्त्रायलच्या याच धोरणाचा विरोध करत अनेक राष्ट्रांनी अमेरिकेने इस्त्रायलवर दबाव टाका आणि हे युद्ध थांबवावे असे आवाहन केलेले आहे.

पान ४ वरून

### आम आदमी पार्टीच्या

पंजाबमध्ये आम आदमी पार्टी सरकारने अशा आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना प्रती हेक्टर ५०,००० ची मदत जाहीर केली होती. महाराष्ट्र सरकारनेही तशीच तात्काळ मदत जाहीर करावी, अशी आमची आग्रही मागणी आहे. यासंदर्भात एक सर्व निवेदन जिल्हाधिकारी यांच्यामार्फत मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री श्री. अजितदादा पवार, व कृषिमंत्री श्री. दत्तात्रेय भरणे यांच्याकडे सादर करण्यात आले होते सरकारने या मागण्यांकडे तात्काळ लक्ष दिले नाही, आम आदमी पार्टी बीड जिल्ह्याच्या वतीने संपूर्ण शेतकरी वर्गासोबत घेऊन रुमनं आंदोलन छेडण्यात आहे, असा स्पष्ट इशारा पक्षाने दिला आहे. याची पूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनावर राहील. असे आव्हान माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी यांच्याकडून शेतकऱ्यांच्या न्यायासाठी, तुम्ही सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहा! करण्यात येत आहे.

### शहरातील पूरग्रस्तांना

तात्पुरता का होईना आधार मिळाला आहे. यावेळी आ.संदीप क्षीरसागर म्हणाले की, पुढील तीन दिवस अत्यंत काळजीचे असून नदीकाठच्या लोकांनी सतर्क रहावे, आम्ही परिस्थितीवर लक्ष ठेवून आहोत. जिल्हा प्रशासनाला ही योग्य त्या सूचना केल्या आहेत. कोणालाही वाऱ्यावर सोडणार नाही असा विश्वास व्यक्त केला. यामुळे या संकटाच्या काळात आ. संदीप क्षीरसागर हे लोकांच्या मदतीला तत्पर असल्याचे दिसून येत आहे. तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही आम्ही पूरग्रस्तांना तातडीचे मदत म्हणून धान्य वितरण सुरू केले आहे. लवकरच आर्थिक मदत सुरू होईल असे सांगितले.

पान १ वरून

### मशिदीतून चिरकण्याचा

दारफळ या गावात अनुभुवायला मिळाला. येथील एका मशिदीमध्ये अडकलेले ज्येष्ठ नागरिक सिकंदर सय्यद यांना सुरेश शिंदे नावाच्या व्यक्तीने वाचवलं आहे. सुरेश यांनी स्वत:च्या जिवाची बाजी लावून सय्यद यांचे प्राण वाचवले. यामुळे सुरेश शिंदे याचं सर्वत्र कौतुक केल जातं आहे.

सध्या माढ्यासह संपूर्ण राज्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. सोलापूर जिल्ह्याला तर पावसाने झोडपून काढलं आहे. अनेक ठिकाणी पूरजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेकांच्या घरात, दुकानांत पाणी शिरून मोठं नुकसान झालं आहे. अशात दररोज मशिदीत झोपायला जाणारे अपंग सिकंदर सय्यद याच पुराच्या पाण्यात अडकले होते. त्यांचा सुरेश यांनी जीव वाचवला आहे.

सिकंदर सय्यद हे नेहमीप्रमाणी काल मशिदीमधे झोपायला गेले. एवढा मोठा पूर येईल, याचा त्यांना काहीच अंदाज नव्हता. पण ते मशिदीत झोपलेले असताना मध्यरात्रीनंतर त्या मशिदीमध्ये पुराचे पाणी शिरायला सुरुवात झाली. अंगाखाली पाणी आल्यानंतर त्यांना जाग आली. त्यांनी रांगत रांगत मशिदीचा दरवाजा उघडला. बाहेर आले. तेव्हा सगळीकडे पाणीच पाणी असल्याचं त्यांना दिसलं. वेळ मध्यरात्रीची होती. त्यामुळे बाहेर पडणं अवघड होतं. त्यामुळे त्यांनी मशिदीत आसरा घेण्याचं ठरवलं.

काही तास तसेच ते पाण्यात बसून राहिले. पण पाण्याची पातळी हळूहळू वाढत होते. पाणी अगदी त्यांच्या छातीपर्यंत येऊ लागले. पहाटेपर्यंत ते तग धरून बसले. पण पाणी गळ्यापर्यंत आल्यानंतर त्यांनी ओरडायला सुरुवात केली. मशिदीतून ते पत्रा वाजवू लागले. तेव्हा बाजूच्या घरावरील काहीजणांना त्यांचा आवाज आला. त्या वेळी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता सुरेश शिंदे यांनी पोहत जाऊन सिकंदर सय्यद अडकलेली मशीद गाठली. ते मशिदीच्या पत्र्यावर चढले. पण पत्रे नट-बोल्टने फिट केले होते. त्यामुळे त्यांनी इतर युवकांकडून पक्कड मागवून घेतली. यानंतर नट काढून आणि पत्रे उचकटून सय्यद यांना ओढून बाहेर काढलं.

### जालना रोडवर

लांब स्लॅब टाकून ठेवला आहे. त्याच्यापुढे इंजि, चाटेने टोलेजंग बिल्डींग बांधली तिथेही नाल्यावर स्लॅब टाकलेला आहे. जालना रोडवर इथून तिथून व्यापा-यांनी गरजेपेक्षा जास्त लांबपर्यंत स्लॅब टाकून नाला कोंडून टाकला आहे. परिणामी तेच पाणी जालना रोडवर आणि पुढे काकू-नाना हॉस्पिटल, एकता नगर भागात शिरले आहे. तर जालना रोडच्या एका बाजुला नाली नसल्याने रोडवरचे पाणी सहयोग नगर, सेन्ट ॲन्स इंग्लिश स्कूल, हिना नगर या भागात शिरल्याने मोठे नुकसान झाले आहे

### धांडे नगरचे हाल

नागरिकांमधून होत आहे. धांडे नगरमध्ये मोठा नाला आहे. चार वर्षापूर्वी या नाल्याच्या कामासाठी २ कोटींचा निधी आलेला होता. मात्र ४ वर्षात आतापर्यंत केवळ १०० फुट नात्याचेच काम झाले आहे. स्यानिकांनी नाल्याचे काम अदविले, मोजणी नसल्यामुळे कामात अडथळे येत गेले, त्यावेळी झुंजार धादेवया भागातील नागरिकांनीत त्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक याना क्स्तुस्थिती सांगितली.

### बीडकरांनो ज्यांच्या हाती

अनेक भागात पाणी शिरले. नदीकाठच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले, पण शहरात ज्या ज्या दुकानाच्या पार्किंगमध्ये पाणी शिरले, लोकांच्या घरात पाणी शिरले, रस्त्यावरुन पाणी वाहिले आणि अजुनही अनेक भागात कमरे इतके पाणी साचलेले आहे. या सर्व परिस्थितीला बेकायदेशीररित्या बांधकाम करणारे, अतिक्रमण करणारे नागरीक जबाबदार आहेत. शहरातील पाण्याचा निचरा होण्यासाठी ज्या नाल्या नगर पालिकेने केल्या आहेत त्या नाल्यांवर आपल्या घरासमोर, आपल्या दुकानासमोर नागरीक, व्यापाऱ्यांनी चक्क स्लॅब टाकलेले आहेत. त्यामुळे नाल्या साफ करता येत नाहीत. नाल्या चौकअप झाल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचते आणि हे साचलेले पाणी मग वाट मिळेल तिकडे घुसते. आपल्या घरासमोरील, दुकानासमोरील नाली व्यवस्थीत साफ झाली.पाहिजे, त्यातून पाणी वाहिले पाहिजे, ही जबाबदारी प्रत्येक नागरिकाची आहे, व्यापाऱ्याची आहे हे विसरून चालणार नाही. अनेक दुकानांसमोर ५० फुटाचे स्लॅब नालीवर टाकण्यात आलेले आहेत.काही ठिकाणी तर नालीला वळण काढून देण्यात आलेले आहे. नगर पालिका या सर्व वाबींकडे लक्ष देत नाही. रस्ते करतांना नाल्याचे उतार, नाल्याची रुंदी, खोली बघितली जात नाही. गुत्तेदार त्याच्या मनाने वाटेल तसे काम करुन बिले उचलून मोकळा होतो. त्याला जनतेने देणे-घेणे नाही अशी परिस्थिती बीड शहरामध्ये आहे. यामुळे पावसाचे पाणी घुसून नुकसान होत आहे. आता हे नुकसान टाळायचे असेल तर नगर पालिकेने व्यापक मोहीम हाती घेऊन दुकानासमोर, घरासमोर टाकलेले स्लॅब, अडविलेल्या नाल्या खरडून काढल्या पाहिजेत. अनेक ठिकाणी रस्त्यावर अतिक्रमणे झालेली आहेत ती तोडली पाहिजेत, अशी मागणी होत आहे.

### बीड शहरातील धांडे

सूचना करण्यात आल्या. यानंतर शहरातील प्रकाश आंबेडकर नगर भागात प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यात आल्या. अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने स्वच्छतेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे स्वच्छता मोहीम राबविण्याची सूचना डॉ. क्षीरसागर यांनी प्रशासनाला केली. मुख्याधिकारी शैलेश फडसे यांनी स्वच्छता निरीक्षक व नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांना तत्काळ कामे सुरू ठेवण्याच्या सूचना केल्या. त्यानंतर बार्शी नाका परिसरातील गाडेकर वस्ती येथे भेट देण्यात आली. येथे रस्ता व नालीसंबंधी गंभीर समस्या असल्याचे नागरिकांनी सांगितले. यावर तातडीने तोडगा काढण्याची मागणी स्थानिकांनी केली.

### दौलावडगाव व

प्रतिक्रिया स्थानिक शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

हवामान खात्याने दिलेल्या रेड अलर्टनुसार शनिवारी रात्रीपासून सतत जोरदार पाऊस सुरू आहे. या मुसळधार पावसामुळे तलाव जलाशय पूर्ण क्षमतेने भरला असून, सध्या फक्त दोन फुट इतकीच मोकळी जागा उरली आहे. दिवसभरात पाऊस असाच कायम राहिल्यास तलाव फुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तलावाखालील सुमारे सहा ते सात घरांची वस्ती या भागात आहे. या वस्तीत राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात प्रचंड भीतीचे वातावरण आहे. १५ सप्टेंबर रोजी झालेल्या पुराच्या भीषण अनुभवामुळे ग्रामस्थ अद्याप सावरले नाहीत, आणि आता पुन्हा पावसाचा धोका समोर असल्याने लोक रात्रभर जागरण करत आहेत. रात्री घरातील प्रत्येक व्यक्ती एकामागून एक जागी राहून पाणी पाहत असतो, असे स्थानिक ग्रामस्थ सांगतात.ग्रामस्थांनी ग्रामसभेत सरपंच यांना कल्पना दिली.१५ सप्टेंबरपासूनच पाटबंधारे विभाग, महसूल विभाग आणि गृह विभाग यांना वारंवार दूरध्वनीद्वारे परिस्थितीची कल्पना दिली आहे. परंतु, आजतागायत कोणत्याही अधिकाऱ्याने घटनास्थळी भेट दिलेली नाही, अशी तक्रार नागरिकांनी केली.

### अहमदनगरच्या आरटीओ

श्रीमती गीता शेजवळ आणि खाजगी इसम इस्माईल पठाण या दोघांनी तक्रारदार यांच्याकडे ओव्हरलोड गाडी त्यांच्या हद्दीतून चालवू देण्यासाठी पैशाची मागणी केली होती. तक्रारदार यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी काल दि.२४/९/२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीची पडताळणी कालच दि.२४/९/२०२५ रोजी केली असता,शासकीय पंच यांचे समक्ष श्रीमती गीता शेजवळ आणि त्यांचा दलाल इस्माईल पठाण यांनी तक्रारदार यांच्या कडे ओव्हरलोड गाडी त्यांच्या हद्दीतून चालवू देण्याकरिता तक्रारदार यांच्याकडे ३००० रुपयांची लाच मागणी करून ते स्वीकारण्याचे कबूल केले.

पडताळणीत सत्यता आढळून आल्याने एसीबीच्या पथकाने कालच सापळा कारवाई आयोजित करून शासकीय पंच ह्यांना सोबत घेत प्रादेशिक परिवहन कार्यालय अहिल्यानगर या ठिकाणी सापळा लावला असता खाजगी इसम इस्माईल पठाण याने तक्रारदार यांच्या कडून ओव्हरलोड गाडी त्यांच्या हद्दीतून चालवू देण्याकरिता गीता शेजवळच्या सांगण्यानुसार ३००० रुपये शासकीय पंचांसमक्ष खाजगी दलाल असलेल्या इस्माईल पठाण याने प्रादेशिक परिवहन कार्यालय समोर, चांदणी चौक परिसरामध्ये स्वीकारले असता खाजगी इसम इस्माईल पठाण याला सापळा पथकाने रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले आहे.घटनास्थळावरच घेण्यात आलेल्या आरोपीच्या अंग झडतीत खाजगी दलाल असलेल्या इस्माईल पठाण याच्या ताब्यातून एक जिओ कंपनीचा मोबाईल व ५०० रुपये रक्कम जप्त करण्यात आले आहे.लाचखोर मोटार परिवहन निरीक्षक व खाजगी इसम यांनी तक्रारदार यांच्या ओव्हरलोड गाडीची त्यांच्या हद्दीतून वाहतूक करू देण्यासाठी ३००० रुपयाची मागणी करून ते स्वीकारले. तसेच मोटार वाहन निरीक्षक गीता शेजवळ यांनी लाच मागणीसाठी प्रोत्साहन दिले.म्हणून मोटार वाहन निरीक्षक श्रीमती गीता शेजवळ आणि खाजगी इसम इस्माईल पठाण यांच्या विरुद्ध पोलीस ठाणे भिंगार कॅम्प , अहिल्यानगर येथे लाचखोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पीआय बल्लाळ

पोलीसांना द्यावी असे आवाहन बल्लाळ यांनी केले आहे. पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड शहर पोलीसांनी गुन्हेगारांना रोखण्यासाठी आणि नशेबाज टवाळखोरांना आवर घालण्याच्या दृष्टीने सर्व टपरी चालकांना बोलावून समज दिली आहे. या पुढे गुटखा किंवा तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केल्यास गुन्हा दाखल करून कडक कारवाई करण्यात येईल असे सांगितले. बीड शहरातील काही टपरी चालक नशायुक्त फुलचंद पानाची विक्री करत आहेत. त्यातून तरूण पिढी आणि लहानमुले देखील सहज नशा करू लागले आहेत. हा प्रकार अतिशय गंभीर आणि तरूण पिढीला नशेच्या खाईत लोटणारा आहे. त्यामुळे एकाही टपरीवाल्याने नशायुक्त फुलचंद पानाची विक्री करू नये अशा सूचना पो.नि.बल्लाळ यांनी केल्या. यावेळी पोलीस कर्मचारी सय्यद शहेंशाह यांच्यासह काही सामाजिक कार्यकर्ते देखील यावेळी उपस्थित होते.

### टीईटीमुळे शिक्षक

आणि गुणवत्ता निश्चित करणे अत्यावश्यक असल्याचे सांगून टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक केले. त्यामुळे राज्यातील लाखो शिक्षकांना आता टीईटी द्यावी लागणार. अल्पसंख्याक शाळांतील शिक्षकांना टीईटी किंवा सीटीईटी अनिवार्य असू नयेत, या संदर्भात न्यायालयात याचिका होती.

मात्र, सर्वोच्च न्यायालयाने पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणार्या सर्व शिक्षकांना टीईटी म्हणजेच शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक केले आहे.दरम्यान, सन २००१ पासून डी.एड. अभ्यासक्रमाच्या गुणवत्तेवर भर देण्यात आला, आरटीई कायद्यानंतर सीईटी, २०१३ पासून टीईटी अनिवार्य करण्यात आल्या. समग्र शिक्षा अभियानांतर्गत सतत प्रशिक्षण, तंत्रज्ञानाचा वापर आणि डिजिटल शाळा यावरही भर दिला गेला. शिक्षकांनीही यास प्रतिसाद देत अध्यापन प्रक्रियेला नवे आयाम दिले. अशा परिस्थितीत सर्वोच्च न्यायालयाने शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक होण्याचा निर्णय दिल्याने शिक्षकामध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.सध्या कार्यरत असलेले हजारो शिक्षकांनी पन्नाशी गाठली आहे. या वयोगटातील शिक्षकांवर घरकर्ज, मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी, आरोग्य समस्या या सारखे ताण आहेत. अशावेळी पुन्हा स्पर्धा परीक्षा द्यावी लागणार असल्याने शिक्षकांची चिंता वाढली आहे. त्यामुळे टीईटीचा निर्णयात बदल करण्याची मागणी शिक्षकांतून होत आहे.टीईटीसाठी वेळ, ऊर्जा आणि मानसिक तयारी ठेवणे अवघड ठरू शकते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सन्मानपूर्वक स्वीकारत असतानाच, शासनाने सध्या कार्यरत शिक्षकांना पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावेत. त्यांच्या अनुभवाचा सन्मान राखून त्यांना योग्य सवलती व टप्प्याटप्प्याने अंमलबजावणीची संधी द्यावी, जेणेकरून गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा उद्देशही साध्य होईल आणि शिक्षकांनाही न्याय मिळेल.